# विगमनाची सहाय्यक प्रक्रिया
# (Supportive Method of Induction)

## व्याख्या (Definition)

मराठीत व्याख्या
संस्कृतमध्ये लक्षण
इंग्रजीत **Definition**

जे विधान एखाद्या पदाचा संपूर्ण अर्थ प्रतिपादन करते व अधिकाचा समावेश करत नाही अशा विधानास त्या पदाची व्याख्या असे म्हणतात.

व्याख्येचे घटक :

1.व्याख्येय – ज्या पदाची व्याख्या करावयाची आह ते पद.

2. व्याख्यात – पदाचा जो अर्थ सांगीतला तो अर्थ.

उदा : मनुष्य म्हणजे विचारशील प्राणी या व्याख्येत मनुष्य हे पद व्याख्येय तर विचारशील प्राणी हे पद व्याख्यात आहे.

# व्याख्येचे नियम

1. ज्या पदाची व्याख्या करावयाची आहे, त्या पदाचा संपूर्ण अर्थ व्याख्येत असावा.
2. व्याख्येतील व्याख्यात पद हे व्याख्येयापेक्षा अधिक स्पष्ट व सुगम असावे.
3. व्याख्या अलंकारिक शब्दात मांडलेली नसावी.
4. ज्या पदाची व्याख्या करावयाची आहे, ते पद साक्षत पर्यायाने किंवा पुनरूक्तीने येउ नये.
5. व्याख्या शक्यतो होकारात्मक किंवा भाववाचक स्वरूपाची असावी.

# व्याख्येचे प्रकार :

1. पदनिर्देश व्याख्या
2. उदाहरण व्याख्या
3. प्रतिशब्द व्याख्या
4. वर्णन व्याख्या
5. निर्माण व्याख्या
6. विश्लेषक व्याख्या

# विगमनाची सहाय्यक प्रक्रिया
(Supportive Method of Induction)

## वर्गीकरण (Classification)

**व्याख्या :**

कुठल्याही बाबींचे साम्य व विरोध लक्षात घेउन, एक विशिष्ट उद्‌देश समोर ठेवून,मनाने केलेले त्याचे संकलन म्हणजे वर्गीकरण होय.

**वर्गीकरणाची वैशिष्ट्ये :**

1. वर्गीकरण कशाचेही होउ शकते.
2. वर्गीकरणात साम्याबरोबर विरोधही लक्षात घेतले जातात.
3. वर्गीकरणास उद्‌देश किंवा प्रयोजन असते.
4. वर्गीकरण ही मानसिक प्रक्रिया आहे.

## वर्गीकरणाचे फायदे:

1. जटील अनुभवविश्वाची व्यवस्था लावता येते.
2. स्मरणशक्तीत वाढ, स्मृती सुलभता निर्माण होते.
3. वेळेची आणि श्रमाची बचत होते.
4. सिद्धांतकल्पना सुचण्यास मदत होते.

## वर्गीकरणाचे प्रकार :

1. नैसर्गिक किंवा स्वाभाविक वर्गीकरण : ज्ञान संपादनाचा हेतु ठेवून केलेले वर्गीकरण.
2. कृत्रिम किंवा विशेष वर्गीकरण : आपली तात्कालिक किंवा व्यावहारिक गरज भागावी या हेतुने केलेले वर्गीकरण.